● शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना विधानसभेसाठी तीन दावेदारांकडून अर्ज दाखल

## महायुतीत बंडखोडी; महाविकास आघाडीतील उमेदवारी जाहीर होण्यापुर्वीच अर्ज दाखल







**जालना । प्रतिनिधी -** निवडणुक आयोगाने निवडणुक कार्यक्रम घोषित केल्यापासून विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची दिवसेंदिवस रंगत वाढत चालली असून अद्याप महायुती आणि महाविकास आघाडीतील जागा वाटप पूर्ण झालेले नाही. काही जागांवर दोन्हीकडील उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. जालना विधानसभेसाठी महायुतीकडुन शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अर्जुनराव खोतकर यांना उमेदवारी जाहीर झाली असून पक्षाने त्यांना एबी फार्म देखील दिला आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीकडुन अद्याप जालना विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर झालेली नाही. अशातच जालना विधानसभा मतदार संघातील निवडणुकीसाठी तीन दावेदारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून यात महायुतीकडुन शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाकडुन अर्जनराव खोतकर यांनी गुरुवार (दि २४) रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच म हाविकास आघाडीकडुन काँग्रेसचे उमेदवार म्हणून कैलास गोरंट्याल व सौ. संगीता गोरंट्याल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे बंधू भास्कर दानवे यांनी देखील अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत म हायुतीत बंडाचा झेडा रोवला आहे. भास्कर दानवे हे भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्षपदावरही कार्यरत आहेत. महायुतीत जालन्याची जागा ही भाजपाला सोडण्यात यावी यासाठी दानवे यांचे प्रयत्न सुरु होते. मात्र, ही जागा शिवसेनेकडे असल्यामुळे खोतकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. निवडणुक लढण्यावर ठाम असलेल्या भास्कर दानवे यांनी गुरुवार (दि २४) रोजी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज भरायला अद्याप चार दिवस बाकी असून अद्यापही ही जागा भाजपाला सोडण्यात येईल अशी आशा भास्कर दानवे यांनी व्यक्त केली आहे.

दानवे यांच्यारुपाने जालन्यात महायुतीत बंडखोरी करण्यात आली असली तरी येत्या ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असल्यामुळे महायुतीतील वरिष्ठ पातळीवरून ही बंडखोरी रोखण्यात देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांना यश येते का? हे ४ तारखेपर्यंत स्पष्ट होईल. राजकीय जाणकारांच्या मते महायुतीत अद्याप आलबेल नसल्यामुळे राज्यातील अनेक ठिकाणी एकमेकांसमोर उमेदवार देण्यात आलेले असून येत्या दोन-तीन दिवसात चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. अन्यथा राज्यातील अनेक ठिकाणी मैत्रीपुर्ण लढती होण्याची देखील शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

महाविकास आघाडीतील जागा वाटप अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यातच जालना विधानसभा ही कॉग्रेस पक्षाला सोडण्यात येणार असल्याचे सांगितल्या जात आहे. ही जागा काँग्रेसला सोडण्यात जरी येणार असली तरी या ठिकाणी काँग्रेसकडुन अद्याप उमेदवारी जाहीर झालेली नाही. असे असतांना काँग्रेस पक्षाकडुन कैलास गोरंट्याव व सौ. संगीताताई गोरंट्याल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे काँग्रेसकडून अब्दुल हाफिज यांनी उमेदवारीसाठी वरिष्ठ पातळीवर शड्डू ठोकलेला आहे. त्यामुळे विद्यमान आमदार कैलास गोरंट्याल यांना पुन्हा संधी द्यावी की त्यांच्या ऐवजी अब्दुल हाफिज यांना उमेदवारी द्यावी अशा मोठ्या पेचात काँग्रेसचे वरिष्ठ नेते-पदाधिकारी पडलेले आहेत. काँग्रेसकडून ४८ जणांची यादी गुरुवार (दि २४) रात्री ९ वाजेच्या दरम्यान जाहीर करण्यात आली असून आहे. या यादीत जालना जालना विधानसभेतील उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. दुसरी यादी शुक्रवार (दि २५) रोजी सायंकाळपर्यंत जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यात महत्त्वाचे म्हणजे अब्दुल हाफिज यांना जालन्यातून उमेदवारी मिळण्याची शक्यता अधिक असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून छातीठोकपणे सांगितले जात आहे.

युवा आदर्श

### रोखे ...

**आनंदोत्सव साजरे**
**मिळाले ज्यांना रोखे**
**कमाई नाही ज्यांची**
**त्यांच्या बंदूका रोखे**
**सामान्य माणसाच्या**
**हृदयात चुकले ठोके**
**असूनि यादीत नावे**
**बोंबाट उच्चारवे ठोके**
**बांधावरला शेतकरी**
**दुष्काळ साही दुःखे**
**रोजगार बुडला तरी**
**मतदाना जातो सुखे**
**शिक्षक जुंपले कामा**
**घाम गाळतात भुके**
**भत्ता मिळेना वेळेवर**
**तरीही राहणारं मुके**
**बेरोजगारी रानोमाळ**
**रे शरमेने डिग्र्या झुके**
**सुशिक्षितपणा मुखा**
**उसवले खिसे झाके**
**इलेक्शन ड्युटी लावा**
**चालतीलं संसार चाके**
**आंदोलना भरकटलो**
**पाऊल वारंवार चुके**
**रुळाची शाश्वती नसे**
**सगळीकडे दाट धुके**
**संशयात बुडला रस्ता**
**कोण पत्करतो धोके**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

# नाटकं, ढोंग केल्याने मतदान होत नाही

## कैलास गोरंट्याल यांचा विरोधकांना टोला

**जालना । प्रतिनिधी -** नाटकं, ढोंग केल्याने मतदान होत नसल्याचा टोला कैलास गोरंट्याल यांनी येथे विरोधकांना लगावला असून साडेचार वर्ष काहीच करायचे नाही आणि सहा महिने इकडे तिकडे फिरायचे यामुळे मतदानात फरक पडत नाही. पाच वर्षे जनतेच्या सहवासात राहावे लागते असेही गोरंट्याल यांनी येथे म्हटले आहे. त्यांनी गुरुवार (दि २४) रोजी दुपारी जालन्याचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हरकर आणि तहसिलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी श्रीमती छाया पवार यांच्याकडे आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले. यावेळी महेश सारस्वत, विजय चौधरी, दीपक भुरेवाल, महावीर ढक्का, सागर चिलका, विनोद यादव, राजेश पवार आदींची उपस्थिती होती. प्रसंगी सौ. संगीता गोरंट्याल यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पक्षाकडुन अद्याप एबी फार्म मिळाला नसला तरीदेखील उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत. काँग्रेसकडुन ४८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून या यादीत जालना विधानसभा मतदार संघाचा समावेश नाही.

उमेदवारी दाखल केल्यानंतर उपस्थीत पत्रकारांशी बोलतांना आ. कैलास गोरंटयाल म्हणाले की, आज आपण नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. पक्षाकडून एबी फॉर्म लवकरच मिळणार असून तो प्राप्त झाल्यानंतर महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आणखी नामनिर्देशनपत्र दाखल करणार आहे. तुमच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांनी विजयाचा दावा केल्याचे पत्रकारांनी निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले भास्कर दानवे यांनी सुद्धा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे ही लढत धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होणार आहे. जितके जास्त उमेदवारी अर्ज दाखल होईल तितकी मोठी लीड मला राहील असे स्पष्ट करून विजयाची खात्री तर आपल्याला पहिल्या पासूनच आहे. कारण ज्या दिवशी मी आमदार झालो. फक्त काम केले, आणि ठोक काम केल्याचे जनतेला दाखवून दिले. पाण्याचे काम ठोक झाले, मेडिकल कॉलेजचे काम ठोक झाले, रस्ते, नाल्या आणि इतर विकासाची अशी किती तरी काम आपण मागील काळात केली असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. निवडणूक आली की, लोकांचं मन परिवर्तित होत नाही. लोक पाच वर्षातील तुमच्या कामाचा हिशोब घेऊन मतदान करत असतात असा टोला आ. गोरंटयाल यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याला लगावला. तुम्ही साडे चार वर्ष काहीच करत नाहीत आणि सहा महिने इकडे तिकडे फिरतात त्यामुळे मतदानात अजिबात फरक पडत नाही. पाच वर्ष जनतेच्या सहवासात राहावं लागतं, त्यांच्या समस्या, अडचणी सोडवावा लागतात तेव्हा लोक मतदान करतात. तुम्ही केवळ नाटक करतात, ढोंग करतात त्याने मतदान होत नाही असा टोलाही आ. गोरंटयाल यांनी यावेळी मारला. महिलांची खातीच सांगतात, विजय कोणाचा होणार असे आपले प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणाल्याचे गोरंटयाल यांच्या निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले काँग्रेस सरकारच्या काळात संजय गांधी निराधार योजनेसह अनेक योजना गोर गरीबांसाठी राबवल्या आहेत. ते मतदान आम्हाला मिळणार असून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणी मतदान आम्हालाच करणार असल्याच्या प्रतिक्रिया बहुतांश बहिणींनी दिल्या आहेत असेही आ.कैलास गोरंटयाल यांनी शेवटी म्हंटले आहे.

# रस्त्यावर बाजार न भरविण्याच्या हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करा

## व्यापारी महासंघाचे पोलीस अधीक्षकांसह मनपा आयुक्तांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सुभाष रोड, सिंधी बाजार, व दाणा बाजार परिसरात दिवाळीनिमित्त रस्त्यावर फेरीवाले दुकाने लावून बसतात.

त्यामुळे रहदारीस व तेथे कायमस्वरूपी व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना अडचण निर्माण होते. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात व्यापारी वर्गाने केलेल्या जनहित याचिकेवर निर्णय देताना वरील नमूद केलेल्या रस्त्यावर बाजार भरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

हायकोर्टाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या मागणीचे निवेदन व्यापारी महासंघाने अपर पोलीस अधीक्षक आयूष नोपाणी व महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांना दिले. त्याप्रसंगी व्यापारी महासंघाचे विनीत साहनी, संजय दाड, श्याम लोया, ईश्वर बिल्लोरे, कापड असोसिएशनचे प्रकाशचंद सुराणा, अर्जुन बजाज, सुदर्शन बांगड, अनिल मेहता, किराणा असोसिएशनचे राजेश शर्मा वेणू गोपाल झवर आदी उपस्थित होते.

# जालन्यातून भास्कर दानवे यांची अपक्ष उमेदवारी

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातून विधानसभा निवडणूक २०२४ साठी मा भास्कर मुकुंदराव दानवे यांनी आज गुरुपुष्यामृत दिनी गुरुवार (दि.२४) रोजी निवडणूक निर्णय अधिकारी हरकळ साहेब यांच्याकडे आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

भास्कर मुकुंदराव दानवे यांनी अर्ज दाखल करण्याआधी श्री क्षेत्र राजुर गणपती चे दर्शन घेतले तसेच घरून निघतांना त्यांचे औक्षण करण्यात आले. कुटुंबियांनी त्यांना विजयी होण्यासाठी आशीर्वाद दिले. अर्ज दाखल करताना यावेळी त्यांच्यासोबत अशोकआण्णा पांगारकर, सिद्धिविनायकजी मुळे, विमलताई आगलावे, विजयजी कामड हे देखील उपस्थित होते,. यावेळी माजी जि प सदस्य, प स सदस्य, नगरसेवक, सरपंच व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवाळी पहाटमध्ये पं. आनंद भाटे यांचे गायन

**जालना । प्रतिनिधी -** गत १६ वर्षापासून संस्कृती मंच जालनातर्फे दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात येत असून, यावर्षी दि. ३० ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वाजता जुना जालना विभागातील मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेते ख्यातनाम गायक पं. आनंद भाटे (आनंद गंधर्व) यांचे सुश्राव्य गायन होणार आहे.



आतापर्यंत अनेक दिग्गज कलावंतांनी या समारंभात हजेरी लावलेली आहे. यंदाच्या दिवाळी पहाट कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांचे निवेदन व प्रशांत पांडव, सुयोग कुंडलकर, गोपाल खोमणे, ललित चोबे यांची साथ संगत लाभणार आहे.

जालनेकर रसिकांनी दिवाळी पहाट कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे व निशुल्क प्रवेशिकांसाठी आरती फूड्स शनी मंदिर जुना जालना, हॉटेल म धुबन छत्रपती शिवाजी महाराज चौक , ओमकार एंटरप्राइजेस गोकुळनगरी, क्टिव कॉम्प्युटर्स मंमादेवी मंदिराजवळ मस्तगड, देकु केटरर्स मुक्तेश्वर लॉन्स जुना जालना येथे संपर्क करावा, असे आवाहन संस्कृती मंचतर्फे करण्यात आले आहे.

संपादकीय पान

# महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांचा अर्ज दाखल!

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना (शिंदे गट) नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे नांव जाहीर होताच आणि त्यांना ए. बी. फॉर्म मिळताच श्री. खोतकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

आज गुरुवारी (दि. २४) सकाळी ११ वाजेच्या दरम्यान त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी त्यांच्या सोबत १०१- जालना विधानसभा मतदारसंघातील युवा नेते संजय खोतकर, युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर. ॲड. सुनील किंगावकर, सौ. दर्शना खोतकर - झोल, सौ. समृद्धी खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, यशराज खोतकर, अभोरे आदींची उपस्थिती होती.

अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शिवसेनेचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून एबी फॉर्म अर्जुनराव खोतकर यांना दिला. यावेळी त्यांच्यासमवेत पुत्र अभिमन्यू खोतकर उपस्थित होते. तत्पूर्वी म्हणजे बुधवारी मुंबई येथे ए. बी फार्म आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानण्यासाठी जात असतांना अर्जुनराव खोतकर यांचा बदनापूर विधानसभा शिवसेनेच्या वतीने समृद्धी महामार्गावर अकोला निकळक शिवारात जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली जंगी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, माजी नगरसेवक राहुल हिवराळे, मेघराज चौधरी,अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर खान, युवा सेना तालुकाप्रमुख ईश्वर पाटील झुंबड, अकोल्याचे सरपंच उपतालुकाप्रमुख महादू गीते, युवा सेना शहर संघटक अमोल दाभाडे ,शहर प्रमुख कैलास खैरे ,सोशल मीडिया तालुकाप्रमुख देवा ढाकणे, सरपंच विलास सावंत, कंडारीचे सरपंच भरत खाडे, रामेश्वर दराडे ,भगवानराव ढाकणे ,कैलास पालवे ,अण्णासाहेब तांबे ,समाधान मुंडे ,शरद गीते ,निवृत्ती राजे ,दत्ता तांबे, कृष्णा ढाकणे, ज्ञानेश्वर दराडे, बालाजी शिंदे यांच्यासह अकोला निकळक, भराडखेडा ,कंडारी, रामखेडा बदनापूर येथील ग्रामस्थ, पदाधिकारी, शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधूम सुरू आहे. आकाश कंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हटले की फटाके, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही एक समीकरण आहे. दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकांची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. १९०९ साली पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध झाला होता त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११५ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरची दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या जवळपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, राजकारण, अर्थकारण, विनोद, साहित्य, कथा, कांदबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य अशा वेगवेगळ्या विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणणे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. फटाके, मिठाई, फराळ यासमवेतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाईला आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाली होती. असे असले तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाइन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते. आता कोरोनाचे दुष्चक्र संपले असल्याने दिवाळी अंकांना पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. यावर्षी अनेक प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक प्रकाशित केले आहेत. यासोबतच ऑडिओ - व्हिज्युअल दिवाळी अंकही आहे. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात व नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यास दिवाळी अंकाचा मोठा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या मित्र परिवारांना, नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा व फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावेत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाचा फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती रुजायलाही मदत होईल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# विधानसभा मतदार संघासाठी २० उमेदवारांचे २६ अर्ज दाखल

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २० उमेदवारांनी २६ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आजपर्यंत एकुण २५ उमेदवारांचे ३२ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर विधानसभा मतदार संघासाठी ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात आसाराम जिजाभाऊ बोराडे (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे), सुरेशकुमार कन्हैलाल जेथलिया (इंडियन नॅशनल काँग्रेस) यांचा समावेश आहे. १००-घनसावंगी मतदारसंघासाठी ३ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात राजेश अंकुशराव टोपे (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), मनिषाताई राजेशभैय्या टोपे (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) यांचा समावेश आहे. १०१-जालना विधानसभा मतदार संघासाठी ४ उमेदवारांनी ५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात अर्जुनराव पंडितराव खोतकर (शिवसेना), कैलास किसनराव गोरंट्याल (इंडियन नॅशनल काँग्रेस), संगीता कैलास गोरंट्याल (इंडियन नॅशनल काँग्रेस) यांचा समावेश आहे. १०२- बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी ७ उमेदवारांनी ८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात चौधरी रुपकुमार नेहरुलाल (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी), कुचे नारायण तिलकचंद (भारतीय जनता पार्टी) यांचा समावेश आहे. १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी २ उमेदवारांनी ५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात श्रीरंगराव रंगनाथराव जंजाळ (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) यांचा समावेश आहे. याप्रमाणे आज एकुण २६ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

आजपर्यंत एकूण ३१२ इच्छुक उमेदवारांना ७५० नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

## गुणवंत माजरेकर यांचे निधन

**सिंधुदूर्ग -** रांगोळी सम्राट गुणवंत माजरेकर यांचे गुरुवारी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई आणि दोन नाती असा परिवार आहे. मांजरेकर यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथे झाला. मांजरेकर यांच्या लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. त्यांचे वडील बडोदा राजघराण्यात चित्रकार होते. बालपण अत्यंत गरीबीत गेलेल्या मांजरेकर यांनी कोळश्याची पूड आणि दारात येणाऱ्या समुद्राच्या वाळूने रांगोळी रेखाटण्यास सुरवात केली. रांगोळी काढण्यात त्यांचा हातखंडा होता.

# बारामतील हायव्होल्टेज लढत; काका-पुतण्या समोरासमोर

**बारामती -** लोकसभा निवडणुकीच्या वेळी बारामती हा हाय व्होल्टेज मतदारसंघ ठरला होता. कारण या निवडणुकीत सुप्रिया सुळे या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून तर सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उभ्या होत्या. या निवडणुकीत शरद पवारांची जादू चालली. सुप्रिया सुळे मोठ्या मताधिक्क्याने निवडून आल्या. ही निवडणूक थेट नणंद भावयजय यांच्यातला सामना होती. तरीही ही निवडणूक शरद पवार विरुद्ध अजित पवार अशीही होती. आता महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. बारामती पुन्हा चर्चेत आहे. बारामतीत काका-पुतण्याची लढाई पुन्हा रंगणार आहे. युगेंद्र पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने तिकिट दिलं आहे. तर अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लढणार आहेत. त्यामुळे बारामतीत काका-पुतणे म्हणजेच अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार ( क्षळीं झरुरी ती र्धीसशपवीर झरुरी ) असा सामना रंगणार आहे. या निवडणुकीत नेमकं काय होणार ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे. तसंच अजित पवारांनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी शरद पवारांनी कशी भूमिका बदलली होती आणि मग त्यांना नंतर कशी साथ लाभली? हे सांगितलं होतं. आता अजित पवारांच्या प्रचाराचा मुद्दा काय असेल? हे पाहणं महत्त्वाचं असेल. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर युगेंद्र पवार शरद पवारांसाठी सक्रीय झाले. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी युगेंद्र पवार यांनी अख्खी बारामती पिंजून काढली. त्याचवेळी युगेंद्र पवार शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणुकीत बारामतीतून उमेदवार असतील अशा चर्चा सुरु झाल्या होत्या. त्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. तसंच श्रीनिवास पवार यांनीही अजित पवारांनी शरद पवारांची साथ सोडायला नको होती असं वक्तव्य केलं होतं. श्रीनिवास पवार आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने सुप्रिया सुळेंचा प्रचार केला होता. बारामती आपल्याच ताब्यात आहे हे लोकसभेला शरद पवारांनी दाखवून दिलं. आता अजित पवारांच्या विरोधात त्यांच्याच पुतण्याला उभं करण्याची खेळी शरद पवारांनी खेळली आहे. त्यामुळे बारामतीचं राजकारण कुठल्या वाटेवर जातं ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे.


# शब्दांचे कोडं

**आडवे शब्द**

३. इच्छा, आशा
५. विपुल, पुष्कळ
८. मज्जाव (करणे)
११. 'फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार,...'
१३. '... घेता, नाम घ्या श्रीहरीचे'
१४. फांदी
१६. पत्त्यांचा एक खेळ
१९. शोक
२४. वेलीचा मांडव
२५. पृथ्वी
२७. फुटक्या नशिबाचा
२८. चांगले
२९. कागदाचे असते, दोऱ्याचे आणि चलतचित्रपटाचेही!
३०. तोरा
३१. जहाज
३२. भ्रम
३३. शिवधनुष्य
३५. हिस्सा
३६. ब्राह्मण
३८. पुरेल इतका
३९. सलगी
४२. श्रम
४३. इतर ठिकाणी
४५. राजाचा अवाजवी आग्रह
४८. सोने
५०. नेत्र
५१. शुल्क (इंग्रजी)
५२. कौशल्य
५४. शस्त्राची तीक्ष्ण कड
५५. नुकसान
५६. संपूर्ण
५७. प्रगटन
५८. गोष्ट
५९. कुंतीचा थोरला पुत्र
६०. पायताण
६२. पंख
६३. मोठेपणा
६४. बालपणीचे दृढ संस्कार
६६. सर्वांचे याअर्थी वापरला जाणारा प्रत्यय- उदा. -- त्रिक
६७. अंत:पुर, जनानखाना
६९. तोंडाने वाजवण्याचे धातूचे एक चपटे छोटे वाद्य
७०. पाप
७२. अडाणी, माहिती नसलेला
७३. म्हतारपणच्या अनुचित सवयी
७५. पाऊस
७६. लोणी
७७. कंबर
७८. कौशल्य

**उभे शब्द**

१. विस्तारपूर्वक
२. तळे
३. जोर, त्वेष
४. एकटा
५. मोकळीक
६. माळजमीन
७. नकली जात
८. मुलींचे एक नाव, गुहा आडनावाच्या जुन्या नटीचे नाव
९. एकाग्र दृष्टी, नजर
१०. काव्य
१२. चित्रकाराची 'लेखणी'
१५. अस्थी
१७. प्रिय व्यक्तींचे एकत्र येणे
१८. अपवित्र
१९. अनपेक्षित, उलट
२०. पंधरवडा
२१. देवाची अर्चना
२२. पराकाष्ठा
२३. अतिशय प्रयत्न
२६. मानलेला मुलगा
२८. विद्यार्थी
३१. त्वचारोग
३१अ. गुलकाडीने पेटणारी, गुल होणारी!
३३. मोराचे सौंदर्य यात असते
३४. भांडण
३५. रस्ता
३७. नीरव
४०. पटकन खाऊन टाकणे
४१. पृथ्वी
४३. ऊस
४४. जखमांमधून रक्त वाहत असलेला
४६. पृथ्वीचा पाण्याने व्यापलेला पृष्ठभाग
४७. दूर
४९. तोंडदेखले
५०. लगेच
५३. उत्सव
५७. शर्त
६०. खेड्यातील रहिवासी
६१. सकल ज्ञान असलेला
६२. गादिमांनी सांगितलेले अजरामर सत्य. '----- आहे जगती पुत्र मानवाचा'
६३. मत्स्य
६४. मंडई
६५. ललाट
६६. अभिनयासह
६८. भावजय
६९. थापा मारणारा
७१. कावेबाज
७२. इतर
७४. चामडे



**कालचे आडवे उत्तर**

१.लालूप्रसाद यादव ७.अचानक ९.कोस ११.हर १२.दरसाल १४.पलायन १५.नगर १६.कवी १७.हटवादी २०.लस २१.वर्ण २२.वात २३.सनदशीर २६.लज्जास्पद २७.दारू २९.वाया ३०.कपटी ३२.नीरस ३४.ससाणा ३६.अमर ३७.कसकस ३८.रामराम ४१.पातक ४३.रम ४४.आसन ४५.दाखला ४६.जळजळ ४७.नरम ४८.कास ५१.घेवडा ५२.वदंता ५२अ.महाराजा ५३.त्राता ५४.ओळख ५६.डक ५७.थडगे ५८.पार ६०.वेतन ६२.चरा ६४.डफली ६६.दरवळ ६८.कसा ७०.मजा ७०अ.खो ७१.वाल ७२.साखर ७३.समाचार ७४.तळवा ७६.बाळ ७८.बन ७९.क्षालन ८०.टक्का ८१.मनमुराद

**कालचे उभे उत्तर**

१.लालनपालन २.प्रहर ३.सार ४.यादवी ५.दर ६.वसाहत ८.कपबशी ९.कोयल १०.सनसनाटी १३.लट १६.कर्ण १८.वास १९.दीनवाणा २१.वदनी कवल घेता २२.वारू २४.दया २५.रकमपात २७.दास २८.दसरा ३१.परत ३३.रस ३५.साम दाम दंड भेद ३७.कमळ ३८.रास ३९.मनन ४०.कलाकार ४२.कस ४३.रजनीनाश ४४.आरडाओरड ४९.समता ५०.सराईत ५२.ताक ५३.लगेच ५५.खपली ५९.नवल ६१.नजरकैद ६३.रमारक्षा ६५.फराळ ६७.रवाळ ६८.कसब ६९.सामान ७४.तन ७५.वाट ७६.बाका ७७.पान



दिवाळी सण साठी लागणारे साहित्य व आकर्षक पणत्या विक्रीसाठी जालना बाजारपेठ दाखल झाल्या आहेत खरेदी करताना नागरिक दिसत आहे.
(छाया मजहर सौदागर)

# वेतन खात्यात होताहेत जमा

## दिवाळीपुर्वी वेतन देण्याचा मार्ग मोकळा

**मुंबई -** राज्यातील सर्व जिल्हा परिषद मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी विद्यापीठे, अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांना २५ ऑक्टोबरपूर्वी वेतन देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी वेतन हाती पडणार आहे.

राज्य शासनाच्या वित्त विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. वित्त विभागाच्या आधुनिक अधिनस्त असलेल्या लेखा आणि कोषागार संचालनालय यांच्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या ट्रेझरी नेट, बीम्स, बिल पोर्टल, सेवार्थ, ग्रास, निवृत्तिवेतन वाहिनी, कोषवाहिनी, अर्थवाहिनी, महाकोष, वेतनिका आदी संगणक प्रणालीच्या संदर्भातील टाटा कम्युनिकेशन यांच्यामार्फत करण्यात येत असलेले डाटा मॅनेज होस्टिंगचे कामकाज महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांच्याकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत सुरू आहे. ही हस्तांतरणाची कार्यवाही तांत्रिक स्वरूपाची असल्यामुळे अतिशय गुंतागुंतीची आहे. या प्रक्रियेचा अविभाज्य भाग म्हणून ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात सर्व प्रणाली बंद ठेवल्या जाणार आहेत. त्यामुळे ऑक्टोबरचे वेतन, निवृत्तिवेतन हे २५ ऑक्टोबरपूर्वी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या आदेशानुसार ऑक्टोबरचे वेतन आणि निवृत्तिवेतन २५ ऑक्टोबर पूर्वी होण्यासाठी राज्याच्या लेखा व कोषागार संचालक कार्यालयाने सर्व जिल्हा कोषागार कार्यालय व उपकोषागार कार्यालय यांना आवश्यक त्या सूचना तत्काळ देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# लॉयन्स दृष्टी नेत्रालयाला सोनी परिवाराकडून ५१ हजाराचे योगदान



**जालना | प्रतिनिधी -** परतुर येथे लोकसभागातून उभारण्यात आलेल्या आणि परतुर पंचक्रोशीतील सुमारे २०० गावांसाठी वरदान ठरत असलेल्या लॉयन्स दृष्टी नेत्रालयाला जालना येथील सोनी परिवाराच्यावतीने ५१ हजार रुपयांचे आर्थिक योगदान देण्यात आले. अरुण सोनी, मिनाक्षी सोनी, आनंद सोनी, पुनम सोनी आणि रोटरी क्लब जालना सेंट्रलचे अध्यक्ष डॉ. अभय सोनी यांच्याहस्ते ५१ हजाराची देणगी लॉयन्स दृष्टि नेत्रालय परतुरचे अध्यक्ष मनोहर खालापुरे, संचालक अतुल लड्ढा आणि संजीवनी खालापुरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी लायन्स क्लब जालना मर्चंट सिटीचे सदस्य विनोद पवार आणि विनोद कुमावत उपस्थित होते. नेत्रालयाला भेट दिल्यानंतर, सोनी परिवाराने या सेवाभावी कार्याविषयी जागरूकता निर्माण करत आर्थिक योगदान दिले. मागील दीड वर्षांपासून कार्यरत असलेल्या या नेत्रालयात आतापर्यंत हजारो रुग्णांची तपासणी करण्यात आलेली असून, मोतीबिंदूच्या २ हजार ७०० शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केल्या आहेत. लॉयन्स क्लबसच्या माध्यमातून उभारलेले हे सेवामंदिर नियोजनबद्धरीत्या कार्यरत आहे. लोकसहभागातून उभारलेले हे नेत्रालय समाजासाठी अतिशय उपयुक्त ठरत आहे. या योगदानाबद्दल नेत्रालयाच्यावतीने सोनी परिवाराला स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

# काँग्रेसकडून ४८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

## पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरातांसह ज्येष्ठ आमदारांचा समावेश

**मुंबई -** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी सर्वपक्षीय उमेदवार याद्या जाहीर होत आहेत. महाविकास आघाडीच्या उमेदवारी यादीची उत्सुकता लागली होती. आता काँग्रेसने त्यामध्ये बाजी मारली आहे. काँग्रेसने आपली पहिली उमेदवारी यादी जाहीर केली आहे. पहिल्या उमेदवारी यादीमध्ये ४८ उमेदवारांचा समावेश आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीमध्ये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यासारख्या ज्येष्ठ आमदारांचा समावेश आहे. तसेच, या यादीतून पुन्हा घराणेशाही दिसून आली आहे,

**४८ उमेदवारांची पहिली यादी**

अक्कलकुवा - ॲड. के.सी. पडवी, शहादा - राजेंद्रकुमार कृष्णराव गावित, नंदुरबार - किरण दामोदर तडवी, नवापूर - श्रीकृष्णकुमार सुरुपसिंग नाईक, साक्री - एसटी प्रवीणबापू चौरे, धुळे ग्रामीण - कुणाल रोहिदास पाटील, रावेर - ड. धनंजय शिरीष चौधरी, मलकापूर - राजेश पंडितराव एकाडे, चिखली - राहुल सिद्धिविनायक बोंद्रे, रिसोड - अमित सुभाषराव झनक, धामणगाव रेल्वे -प्रा. वीरेंद्र वाल्मीकराव जगताप, अमरावती - डॉ. सुनील देशमुख, तेओसा - ड. यशोमती चंद्रकांत ठाकूर, अचलपूर - अनिरुद्ध बबलूभाऊ सुभानराव देशमुख, देवळी - रणजित प्रताप कांबळे, नागपूर दक्षिण पश्चिम - प्रफुल्ल विनोदराव गुडधे, नागपूर मध्यवर्ती - बंटी बाबा शेळके, नागपूर पश्चिम - विकास पी. ठाकरे, नागपूर उत्तर - डॉ. नितीन काशिनाथ राऊत, साकोली - नानाभाऊ फाल्गुनराव पटोले, गोंदिया- गोपालदास शंकरलाल अग्रवाल, राजुरा- सुभाष रामचंद्रराव धोटे, ब्रह्मपुरी - विजय नामदेवराव वडेट्टीवार, चिमूर - सतीश मनोहरराव वारजूकर, हदगाव - माधवराव निवृत्तीराव पवार पाटील, भोकर- तिरुपती बाबुराव कदम कोंडेकर, नायगाव - मीनल निरंजन पाटील (खतगावकर), पाथरी - सुरेश अंबादास वरपुडकर, फुलंब्री - विलास केशवराव औताडे, मीरा भाईंदर - सय्यद मुजफ्फर हुसेन, मालाड पश्चिम - अस्लम आर. शेख, चांदिवली - मोहम्मद आरिफ नसीम खान, धारावी - डॉ. ज्योती एकनाथ गायकवाड, मुंबादेवी - अमीन अमीराली पटेल, पुरंदर - संजय चंद्रकांत जगताप, भोर - संग्राम अनंतराव थोपटे, कसबा पेठ - रवींद्र हेमराज धंगेकर, संगमनेर - विजय बाळासाहेब थोरात, शिर्डी - प्रभावती जे.घोगरे, लातूर - ग्रामीण धिरज विलासराव देशमुख, लातूर शहर - अमित विलासराव देशमुख, अक्कलकोट - सिद्धाराम सातलिंगप्पा म्हेत्रे, कराड दक्षिण - पृथ्वीराज चव्हाण, कोल्हापूर दक्षिण - रुतुराज संजय पाटील, करवीर - राहुल पांडुरंग पाटील, हातकणंगले - राजू जयंतराव आवळे, पलूस-कडेगाव - डॉ. विश्वजीत पतंगराव कदम, जाट - विक्रमसिंह बाळासाहेब सावंत

दरम्यान, महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडून विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर करण्यात आलेली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून ६५ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून ४५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आलेल्या आहेत.


# पाहिजेत

## तालुका प्रतिनिधी / वार्ताहर / वितरक पाहिजे

**जालना जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दैनिक युवा आदर्शसाठी खालील ठिकाणी तालुका प्रतिनिधी / वार्ताहर / वितरक नेमणे आहेत.**

१. जालना, भोकरदन, बदनापूर, अंबड, घनसावंगी, तालुक्यात तालुका प्रतिनिधी तसेच वितरक नेमणे आहेत.

२. वालसावंगी, पारध, जळगाव सपकाळ, आन्वा, आव्हाना, भायडी, सोयगाव देवी, हसनाबाद, नळणी, राजुर, तळेगाव, वरुड, माहोरा, कुंभारझरी, अकोला देव, दाभाडी, बावणेपांगरी, गेवराई बाजार, सेलगाव, रोषणगाव, वाघ्रुळ जहागीर, पिरकल्याण, मौजपूरी, सेवली, नेर, रामनगर, देवमुर्ती, रेवगाव, भाटेपुरी, तळणी, खोराडसावंगी, जयपूर, पांगरी गोसावी, केंधळी, वाटूर, सातोना, पाटोदा माव, आष्टी, कोकाटे हादगाव, रांजणी, राणी उंचेगाव, गुरु पिंप्री, चिंचोली, कुंभार पिंपळगाव, पिंपळखेड, तीर्थपुरी, आंतरवाली टेंभी, पारनेर, रोहिला गड, जामखेड, ताड हादगाव, धाकलगाव, साष्ट पिंपळगाव, शहागड, गोंदी, या भागात वार्ताहर आणि वितरक नेमणे आहेत.

**संपर्क : ८३९००९८८८६ (केवळ व्हॉटस्अप),**

ईमेल yuva.aadarsh@gmail.com

Web- Site : www.yuvaadarsh.com


# भारताचे सरन्यायाधीश म्हणून संजीव खन्ना यांची निवड

**नवी दिल्ली -** भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सजीव खन्ना यांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ही घोषणा केली. मावळते सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी मागच्या आठवड्यातच संजीव खन्ना यांचे नाव सुचविले होते. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ११ नोव्हेंबर रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांच्या काळात त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल घेतले आहेत. ११ नोव्हेंबर रोजी विद्यमान सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांचा कालावधी संपत आहे. याच दिवशी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे १९६० रोजी झाला असून सुमारे चार दशकाहून अधिक काळ ते न्यायिक क्षेत्रात काम करत आहेत. १९८३ साली दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी जिल्हा न्यायालय तीस हजारी कोर्ट नंतर दिल्ली उच्च न्यायालय आणि विविध लवादांमध्ये वकिली केली. घटनात्मक कायदा, कर आकारणी, विविध लवाद, व्यावसायिक कायदे, कंपनी कायदे आणि पर्यावरण कायदे यासारख्या कायद्याच्या अनेक क्षेत्रात त्यांनी यशस्वीरित्या वकिली केली.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस तीन वर्षाची शिक्षा

## जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील आरोपी सुदाम कोंडीबा गोफने यास जिल्हा व सत्र न्यायालय जालना मा. न्यायाधीश श्रीमती वर्षा एम मोहिते यांनी कलम ०८ लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ नुसार तीन वर्षे सक्त मजुरी व तीन हजार रुपयांचा दंड, दंड न भरल्यास तीन महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील भारत के खांडेकर यांनी काम पाहिले. घटनेची हकीकत अशी की ५/ ९/ २०२३ पीडित मुलगी टेंभुर्णी येथील मस्के कॉलनी मध्ये सायंकाळी पाच वाजता लिंबाच्या झाडाचे लिंबू तोडत असतांना आरोपी शेळ्या चरण्याच्या बहाण्याने तेथे जाऊन विनयभंग केला. पीडित मुलीने आरडाओरडा केल्यानंतर प्रत्यक्षदर्शी आरिफ शहा तेथे आल्यानंतर आरोपी पळून गेला. पीडित मुलीने व तिच्या नातेवाईकांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशनला आरोपी विरुद्ध गुन्हा २३१ /२०२३



कलम ३५४ (अ ), ३५४ (ड), भादवि सह कलम ८, १२, पोक्सो कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला. टेंभुर्णी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी तपास करून पीडित मुलगी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ पंचनामा, यावरून दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर सरकार पक्षातर्फे चार साक्षीदार तपासण्यात आले व टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांची साक्ष महत्त्वाची ठरली. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस शिक्षा ठोठावली.

# शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांचा उमेदवारी अर्ज दाखल




**परतूर । प्रतिनिधी -** शिवसेनेचे जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांनी ०९९ परतूर विधानसभा मतदार संघातून अपक्ष म्हणुन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे यावेळी मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचेसभापती प्रल्हादराव बोराडे ,उप जिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, परतुर शिवसेना तालुका प्रमुख अमोल सुरूंग, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, ओबीसी जिल्हाध्यक्ष शिवाजीराव तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे, युवा सेना तालुका अध्यक्ष अविनाश कापसे,सरपंच दिनकरराव शेंडगे ,दलित आघाडी अध्यक्ष राहुल भदर्गे, शिव लहु सेनेचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद कसाब, उप तालुका प्रमुख नितीन राठोड, उपतालुका प्रमुख शरद तळेकर, वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष कैलास चव्हाण, बंजारा नेते राम राठोड, गोविंद खरात ,उप तालुकाप्रमुख व्यंकटेश लीपणे, उप तालुका प्रमुख सोपान कातारे, युवा सेना उपतालुकाप्रमुख बाळासाहेब अभोरे, तालुकाप्रमुख रंजीत कोल्हे, नितीन राठोड, अल्पसंख्याक अध्यक्ष खाजा शेख चांद,विलास राठोड राजाराम भांडवलकर. उपशहर प्रमुख कैलास पुरी, मधुकर निलेवाड,विभाग प्रमुख नागेश चिखली,विभाग प्रमुख प्रल्हाद शेळके ( सेवली सर्कल ) विभाग प्रमुख अतुल आर्दड. व शिवसेना पदाधिकारी परतूर मंठा नेर सेवली कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपाकडुन घनसावंगी विधानसभेसाठी इच्छुक; उमेदवारी न मिळाल्यास जालन्यातून अपक्ष लढणार - सुनील आर्दड

**जालना । प्रतिनीधी -** घनसावंगी विधानसभा मतदार संघातून भाजपा तर्फे निवडणूक लढविण्यास आपण इच्छुक आहे. मात्र, उमेदवारी न मिळाल्यास आपण जालन्यातुन अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे भाजपा नेते माजी नगराध्यक्ष सुनील आर्दड यांनी आज गुरुवारी येथे एका पत्रकार परिषदेत सांगितले.

अंबड रोडवरील मातोश्री निवासस्थानी आज गुरुवारी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेत आर्दड यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी अंकुशराव बोबडे, रमेश काळे, कैलासरव शेळके, अर्जुन मालोदे, प्रकाश गहिरे, प्रकाश जायभाये, मधुसूदन दंडारे आदींची उपस्थिती होती. सुनील आर्दड यावेळी बोलतांना म्हणाले की, घनसावंगी विधानसभा मतदार संघातील राजा टाकळी हे आपले मूळ गाव आहे. त्यामुळे घनसावंगी मतदार संघातील जवळपास २२० गावात पोहचून सदर गावात भाजपाचे संघटन मजबूत करण्यावर आपण मागील दहा ते पंधरा वर्षात भर दिला असल्याचे आर्दड यांनी सांगितले. या सर्व गावांमध्ये पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच सामाजिक कार्याच्या माध्यमातून तळागाळातील लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न आपण सातत्याने केला आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊनच आपण भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे घनसावंगी विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मागितली असल्याचे सांगून घनसावंगी मतदार संघावर आपला दावा आहेच, परंतु जालन्यातून देखील लढण्याची आपली तयारी आहे. महायुतीत जालण्याची जागा शिंदे गटाला सुटली असली तरी अनेक व्यापारी, उद्योजक, वकील, शहरातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर आपण जालना विधानसभेची निवडणूक लढवावी यासाठी आग्रही आहे. जालन्यात आता बदल हवा, नवीन चेहरा समोर आला पाहिजे ही जनभावना असून ही जनभावना लक्षात घेऊन आपण विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर आणि सर्वसामान्य जनतेच्या भेटी घेवून त्यांची मतं जाणून घेतल्यानंतर जालन्यातून निवडणूक लढविण्याबाबत अंतिम निर्णय घेणार असल्याचे आर्दड यांनी यावेळी स्पष्ट केले. २००१ मध्ये आपण जालन्यात नगरसेवक म्हणून निवडून आलो होतो. राजकीय क्षेत्रात नगरसेवक, नगराध्यक्ष,भाजयुमो जिल्हाध्यक्ष आदी पदांच्या माध्यमातून आपण जालना शहरात भरीव काम केले असून सामाजिक क्षेत्रात देखील आपण योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे.अंबड रोडवरील मातोश्री लॉन्समध्ये मागील तीन वर्षांपासून मोफत योग वर्ग भरवली जातात. त्याचा अनेक नागरिकांना लाभ झाला असून श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर महासंघाच्या माध्यमातून जालना शहरात विविध सामाजिक उपक्रम आपण राबवले आहेत. शिवाय रक्तदान शिबिर, कराटे प्रशिक्षण, आत्महत्याग्रस्त ३५ शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत असे अनेक उपक्रम आपण राबवले असल्याचे सुनील आर्दड यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.



जालना शहर आणि जिल्ह्यात भाजपा संघटन मजबूत करण्यासाठी मागील २८ वर्षापासून आहे. घनसावंगी विधानसभा मतदार संघातही भाजपा पक्ष गावागावात पोहचवला. या उलट सतीश घाडगे यांनी मागील दीड वर्षापूर्वी भाजपात प्रवेश असून ते संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथील रहिवाशी आहेत. राजकारणात आपण त्यांना प्रतिस्पर्धी मानत नाही असे देखील सुनील आर्दड यांनी पत्रकारांनी उपस्थीत केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले. भास्कर दानवे यांनी देखील मागील काही वर्षात जालना विधानसभा मतदार संघात भाजपाला मजबूत करण्यावर भर दिला असल्याचे सांगून महायुतीत प्रत्येक वेळी अन्याय होत असेल तर प्रतीक्षा कुठपर्यंत करायची ? असा सवाल उपस्थित करत जालना विधानसभेची निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून लढविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.